**प्रा.डॉ .खरात : शास्त्री महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यान**

**परतूर** ▪ येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवारी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगीय आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत खंदारे होते. तर यावेळी उपप्राचार्य डॉ. रवि प्रधान, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. दिनकर टकले, डॉ . शंकर तळेकर, डॉ. भागवत नाईकनवरे, प्रा. सखाराम टकले, प्रा. दुबाले हे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. मिलींद खरात यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, भारतीय संविधानाने मतदाराना दिलेला मतदानाचा हक्क खुप अनमोल आहे. आपण या हक्काचा योग्य वापर करून आपली लोकशाही बळकट करू या असे त्यांनी सर्वांना आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल कुलकर्णी यांनी केले.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. रवि प्रधान यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य भारत खंदारे सरांनी निकोप आणि मजबुत लोकशाहीसाठी युवकांनी धर्म, जात, पंथ न पाहता मतदान करावे असे सांगितले. शेवटी डॉ. सुसर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयाचे अधिक्षक दशरथ देवडे, ग्रंथपाल डॉ. चौधरी, प्रा .सुरवसें , प्रा बिडवे, प्रा जोशी, प्रा फासे, प्रा. अबूज प्रा. सुरुंग इत्यादी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

Deshonnati Edition
Jan 26, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com

# Voter Registration & Awareness 2022










**Savidhan Din Celebration ,Principal Dr. Bharat Khandare, Vice –Principal Dr. R. G. Pradhan, Prof A. D. Kharat, N.S.S.P. O. Dr. Anil Kulkarni, Prof. R.D. Manawar, Prof. Ashok Pathak and all Teachers & Students.**




**Child Marriage Awareness: Rally**




**N.S.S. Voluntary and Programme Officers**









**Swachhata Abhiyan at College campus**




**Plantation: Principal Dr. B.D. Khadare, Vice-Principal Dr. R. G. Pradhan, N.S.S. P.O. & Teaching Staff.**





**Dr. Susar & N.S.S. students planting Cocconut Plant, at Adoppted Village Hatadi.**


OPPO F11 Pro
2023/01/23 09:28







**Campus Cleaning: Principal Dr. B. D. Khandare, N.S.S. Programme Oficers and Students**







**Campus Cleaning :Principal Dr. B. D. Khandare, , N.S.S. Programme Oficers and Students**


OPPO F11 Pro
2022/08/17 11:31


तालुका स्तरीय प्रचार व प्रबोधन



**Start-Up Programme & Guaidance to Students.**



# Celebration of Azadi Ka Amrutmohaushv









**Celebration of Independence Day Principal Dr. Bharat Khandare with Ex Military Man.**






OPPO Reno2 F · ©Maddy Khose
2022/08/12 09:37






स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत
हर घर तिरंगा
अभियान १३ ते १५ ऑगस्ट २०२२
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय परतूर
ता.परतूर जि.जालना










Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

**Lifelong Learning and Extension Department**

LalbahadurSachi College, Partur

2017-2018 Academic year report

This department was started for the first time in the college for the academic year 2017-2018. A total of 30 students are enrolled in this department. On August 15, this college was inaugurated by the Principal of the College, BhagwanDirange. At this time, the senior professorDinkarTakle was the main attendant. The role of this department and the benefits of this department are explained for the students of the college. In the same month on 17 august a competition exam on essay and oratory was conducted regarding the problems of marathvada and the contribution by youngster.

On 4th and 5th September, a lecture was given on the topic 'Health Malnutrition and Measures for College Girls' and 'required Measures, by Dr.Vaishali Chaudhary, Women Health Officer, to create awareness among the students of the college.On 5th of this, the lecture was given on the guidance of Dr.Vaishali Chaudhary on the same topic for village women at Mapegaon.

Two day scholarship on the 6th and 7th of October, the Symposia, Business Guidance and Placement Workshop was held. The program was inaugurated by Dr.AnandWagh and Chairman of the program Principal BhagvanDirange. In the morning session of the first day, on the development of personality, Dr.AnandWagh unveiled various aspects of personality and gave detailed guidance.In the afternoon session, Professor Sharad Borade gave detailed guidance on 'Art of writing'. In the first session, the lecture was given by Professor Rajesh Nage on 'Business Guidance'. In the afternoon session, Dr.GajanandJadhav's Principal, Sharad Borade, a successful entrepreneur interviewed the interview.

On 19th December, Dr.GajananJadhav's 'Professional guidance and training based on farm business' was conducted for the villagers of Vadhona village. Similarly, on Thursday, 12th December, for the students of the college, Dr.GajananJadhav's agricultural business-based business guidance and training was conducted.

On January 16, the kirtan was taken on the social issues of the doctor Vaidya (ignorance, superstitions, addiction) for the Khandvi village scheme. Similarly, on January 17, on the same issue of GunjkerMaharajPartur, the Keertan was conducted for students of the college.

The certificate was given by Prof.Dongre Sir on 1st February, and certificate was distributed to the students participating in the expansion centre regarding competition examination guidance.

Coordineter
Doc. Shailendrashelar
Lifelong Learning and Extension Department
LalbahadurSachi College, Partur

Resi.(02484) 221533 Tel. & Fax.(02484) 221082
Marathwada Sarvodaya Shikshin Prasarak Mandal's
# Lalbahadur Shastri Sr. College,Partur.
***(Arts,Commerce & Science)***
Tq.Partur Dist.Jalna(M.S.)NAAC-Accredited-B+
Web: www.lbscpartur.co.in Email-lbsc_ptr@rediffmail.com / lbscptr@gmail com **M.8275520365**

Ashabai Babasaheb Akat
**President**

Dr.Bhagwan Dirange
**Principal**

O.W.No. 956/LBSC/2018-19 Date 09/03/18

To,
The Director & Head,
Lifelong Learning & Extension,
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad.

**Subject: Submission of year Report and accounts.**

**Dear Sir,**

With reference to above cited subject I am submitting herewith the complete year report and account audit statement with utilization certificate of our college for the extension activities performed in the academic year 2017-2018.

All necessary photos and document are enclosed herewith.

Thanking you,

Yours Sincerely,

**Principal**

PRINCIPAL
Lalbahadur Shastri Sr. College
PARTUR Dist. Jalna (M.S.)

Encls.:- i) Complete year Report in Eng. & Marathi with Photos.
ii) Utilization certificate.
iii) Statement of expenditure.
iv) News paper cuttings.

<u>**Utilization Certificate**</u>

Certified that the **Principal Lal Bahadur Shastri Mahavidyalaya Partur, District Jalna** has incurred the total expenditure of Rs. 20,000/- (Rs. Twenty Thousand Only) towards the implementation of extension activities and students counseling and career guidance.

The details of expenditure incurred are as under:

| | | |
|---|---|---|
| (A) | i) Extension activities at College Level | Rs. 3000/- |
| | ii) Extension activities at the Community Level | Rs. 5000/- |
| | iii) Honorarium to College Programmer Officer | Rs. 1000/- |
| | iv) College Contribution | Rs. 1550/- |
| (B) /- | i) Students Counseling and Career Guidance | Rs. **11,000/-** |

**Total Expenditure Rs. 21,500/-**

**Against the above expenditure incurred the college has received grant of Rs. 20,000/- (Vide Cheque No.140226 Dated 31.07.2017) from the Registrar Dr. Babasaheb Ambedkar, Marathwada University, Aurangabad Vide Letter No. आशिविवि/२०१७/१४९-२०८ Dated 14/08/2017.**

**Further that the college has incurred the expenditure according to the terms and condition laid down by the university.**

**Principal**

PRINCIPAL
Lalbahadur Shastri Sr. College
PARTUR Dist. Jalna (M.S.)

**Chartered Accountant**

For SUNIL SALUNKE & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS
9/3/18
M.NO. 105421 PROPRIETOR

## Statement of Expenditure


| Receipt | Amount | Head of Expenditure | Total Incurred |
|---|---|---|---|
| University Fund | 20,000.00 | A] | |
| | | 1) Extension Activities at the College Level | |
| College | | a) Health awareness at the College Level | 2050.00 |
| Contribution | 1550.00 | b) Campus Cleanliness | 1450.00 |
| | | c) Awareness about AIDS | 1000.00 |
| | | d) Blood Donation | |
| | | e) | |
| | | f) etc. | |
| | | 2) Extension activities at the Community Level | |
| | | a) Celebration of International Literacy Day | 1000.00 |
| | | b) Cleanliness Movement | 1200.00 |
| | | c) World Environment day | 2850.00 |
| | | d) | |
| | | 3) Honorarium to the college Programme Officer | 1000/- |
| | | B] | |
| | | 1) Students Counseling and career Guidance | 2500.00 |
| | | a) Students Counseling | 4500.00 |
| | | b) Career Guidance | 2000.00 |
| | | c) Personality Development Camp | 1000.00 |
| | | d) Interview Techniques | 500.00 |
| | | e)Audit Fees | 500.00 |
| Total | 21550.00 | | 21550.00 |

**Charted Accountant**
For SUNIL SALUNKE & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS
9/3/18
M.NO. 105421
PROPRIETOR

**Programmer Officer**

**Principal**
PRINCIPAL
Lalbahadur Shastri Sr. College
PARTUR Dist. Jalna (M.S.)


शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय,परतूर
शिक्षण आणि विस्तार विभाग
मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने


मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय,परतूर
व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने
व्याख्यानाचे आयोजन
: विषय :
व्यक्तिमत्व विकास



मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय,परतूर
व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने
वक्तृत्व स्पर्धा
आजच्या युवकांच्या समस्या आणि सामाजिक
दि.२७ डिसेंबर २०१७

**पुढारी**

## संक्षिप्त

# स्वधर्म ओळखूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा : प्रा. डॉ. आनंद वाघ




परतूर : येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. आनंद वाघ, व्यासपीठावर प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. भागवत नाईकनवरे.

**परतूर :** स्वधर्म म्हणजे स्वतःची ओळख. स्वतःमध्ये असणारे राजहंस गुण ओळखून त्या गुणांची खऱ्या अर्थाने जोपासना करणे म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास होय, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आनंद वाघ यांनी केले. परतूर येथील लालबहादूर शास्त्र महाविद्यालय व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भागवत नाईकनवरे यांची उपस्थिती होती. प्रा. वाघ म्हणाले की, स्वतःवर प्रेम करा. जो स्वतःवर प्रेम करतो तोच खऱ्या अर्थाने इतरांवर प्रेम करतो. आपल्या समस्यांना जबाबदार आपणच आहोत. त्यामुळे तुम्हाला जे जमते त्याचा विकास करा. आपल्या आवडी, छंद जोपासा, सकारात्मकतेचा विकास करा. कुटुंब, समाज, राष्ट्राचा विकास करण्याची ताकद तुमच्यात आहे, ती तुम्ही करा अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक समन्वयक डॉ. शैलैद्र शेलार यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. शरद बोराडे यांनी तर प्रा. दिलीप मनवर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. बद्रीनारायण बिडवे, डॉ. कैलाश सोनुने, प्रा. विजयानंद गंगावणे, डॉ. राजेश सुसर, डॉ. रवी प्रधान, प्रा. सतीश मगर, प्रा. मुजमुले आदींनी परिश्रम केले.



26

17.18

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, शनिवार, दि. १० मार्च २०१८

## परतुरात रक्तदान शिबीर व महिलांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : महिलांच्या त्यागावरच आपली संस्कृती उभी असून, स्त्री जन्माचे आपण स्वागत केले पाहिजे, असे प्रतिपादन सभापती कपिल आकात यांनी व्यक्त केले.

येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व क्रिडा विभागाच्या वतीने स्व. बाबासाहेब भाऊ आकात व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून व्याख्यान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सभापती कपिल आकात हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव कुणाल आकात, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, उपप्राचार्य संभाजी तिडके, जि.प. सदस्य शिवाजी सवने, सरपंच छत्रगुण कणसे, सुजाता देशपांडे, ऋषिकेश सोळंके हे होते. सभापती आकात म्हणाले की, महिलांचा सन्मान करुन त्यांना संरक्षण देणे गरजेचे आहे. महिलांच्या सबलीकरणाविषयी केवळ कायदे करुन उपयोग नाही, तर प्रत्येकाने बेटी बचाव बरोबरच महिलांवरील अत्याचार रोखणे आवश्यक आहे. प्रास्ताविक डॉ. सुधाकर जाधव यांनी केले तर सूत्र संचालन प्रा. शरद बोराडे यांनी केले.

### कर्तृत्वावान महिलांचा सन्मान

- या रक्त दान शिबीरात ५१ रक्तदात्यांनी रक्त दान केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कर्तृत्वावान महिलांचा सत्कार करण्यात आला. तर मान्यवरांसह इतर महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास भगवान आकात, डॉ. सुधाकर जाधव, प्रा. भागवत नाईकनवरे, सदाशिव मुळे, मिलींद खरात, प्रा वैशाली चौधरी, प्रा. मिनाक्षी फासे, प्रा. बिडवे सह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागाच्या वतीने महिला दिनानिमित्त व्याख्यान, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सभापती कपिल आकात व इतर.

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
शुक्रवार, दि.१९ जानेवारी २०१८



परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविदयालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी विचार व्यक्त करताना महाविद्यालयाची विद्यार्थीनी अंजूम पठाण. विचारमंचावर प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. भागवत नाईकनेवरे व प्रा. दिलीप मनवर दिसत आहे.

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, बुधवार, दि. १९ डिसेंबर २०१८

भास्कर पेरे : परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात व्याख्यान, वृक्षलागवड करण्याचे आवाहन

## कोणतेही काम मनापासून केल्यास हमखास यशप्राप्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतांना सकारात्मक वृत्ती ठेवली पाहिजे. यश मिळवायचे असल्यास ते मनापासून करावे तेव्हाच ते यश तडीस लागते असे प्रतिपादन निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त सरपंच भास्कर पेरे यांनी केले आहे.

येथील लाल बाहदूर शास्त्री महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी सरपंच पेरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य संभाजी तिडके, सरपंच छत्रुम कणसे होते. समाज ऐकतो, म्हणून काहीजण काहीही बोलायला लागले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नेहमीच चांगले ऐकण्यावर भर द्यावा इतर गोष्टीकडे करत आपली प्रगती साधावी असे पेरे यांनी सांगितले. पाटोदा मी आदर्श केल आहे. शंभर टक्के कर वसूली आहे. या वसुलीतूनच स्वच्छ पाणी, दळण, विज, रस्ते, कचरा आदी गावातील आम्ही समस्या सोडविल्या आहेत. यामुळे गावाचा विकास करायचा असल्यास यात ग्रामस्थांचा सहभाग महत्वाचा असल्याचे पेरे यावेळी म्हणाले. त्यासाठी गावात एकी असणेही गरजेचे आहे. याच बरोबरच कोणतेही काम मनापासून करण्याचीही गरज आहे. पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा असे आवाहन पेरे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे यांनी केले तर, सुत्रसंचलन प्रा. शरद घोराडे यांनी केले. या कार्यक्रमास डॉ. सुधाकर जाधव, प्रा. भागवत नाईकनवरे, प्रा. सदाशिव मुळे, प्रा. राजेंद्र फासे, प्रा. रवी प्रधान, यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



परतूर येथे लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना पाटोदा येथील सरपंच भास्कर पेरे , यावेळी प्रचार्य डॉ. भगवान दिरंगे,उपप्राचार्य संभाजी तिडके, सरपंच छत्रुम कणसे आदी.

### वृक्षलागवड करा

- महिलांना स्वातंत्र्य देवून त्यांना प्रत्येक कार्यात सहभागी करुन घेवून, ज्या काही अनिष्ट व टाकावू चालीरीती त्याग करण्याचे पेरे यांनी सांगितले. वाढत्या वृक्षतोडीमुळे दिवसेंदिवस दुष्काळाची परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. यामुळे विविध समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी वृक्षलागवड करुन परिसर सुजलाम सुफलाम करावा असे आवाहन यावेळी पेरे यांनी विद्यार्थ्यांना केले.

लोकमत

हॅलो जालना

औरंगाबाद, शनिवार, दि. २६ जानेवारी २०१९





**व्याख्यानमाला....** परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात स्व. बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यान मालेचा शुभारंभ करताना मान्यवर. यावेळी डॉ. भगवान दिरंगे, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. सदाशीव मुळे, डॉ. रवी प्रधान, उपप्राचार्य संभाजी तिडके, दशरथ देवडे, माजी नगराध्यक्ष अंकुश तेलगड, विजय राखे यांच्यासह विद्यार्थी शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कुटुंब पद्धती मोडकळीस आल्याने शेतीच्या ऱ्हासाला सुरुवात

## बी.वाय. कुलकर्णी : लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात स्व. बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : जेव्हापासून संयुक्त कुटुंब व्यवस्था मोडकळीस आली आहे, तेव्हापासूनच शेतीच्या ऱ्हासाला सुरुवात झाली असल्याचे मत प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे.

येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात स्व. बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यान मालेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या व्याख्यान मालेचे पहिले पुष्प गुंफताना प्रा. बी. वाय. कुलकर्णी हे बदलती ग्रामिण मानसिकता या विषयावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुधाकर जाधव, डॉ. सदाशिव मुळे, डॉ. रवी प्रधान, उपप्राचार्य संभाजी तिडके, प्रबंधक दशरथ देवडे, माजी नगराध्यक्ष अंकुश तेलगड, विजय राखे होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. कुलकर्णी म्हणाले, एकत्र कुटुंब व्यवस्थेत शेतीला चांगले दिवस होते. ही पध्दती मोडकळीस आल्याने शेतीचा ऱ्हास होऊ लागला आहे. ज्याच्यावर उपजीविका भागते, त्यावर श्रध्दा आणि प्रेम होते. मग तो कोणताही घटक असो. आज ही विचार सरणी हद्दपार झाल्याने भ्रष्टाचार वाढला आहे. ज्या खुर्चीवर आपले पोट भरते, तिच्यावर श्रध्दा आणि प्रेम केले तर, भ्रष्टाचारास आळा बसेल. ही नैतिकता ग्रामीण भागात होती. त्यामुळे महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला असे म्हटले होते. खोट्या प्रतिष्ठेत वाढलेली मानसिकता हीच ग्रामीण भागातील अधोगतीला कारणीभूत आहे.

त्यामुळे जगण्याच्या पध्दतीत बदल करण्याची गरज आहे. पूर्वी गरिबीत आत्महत्या होत नव्हत्या. आता श्रीमंतीत होऊ लागल्या आहेत. तेव्हाची लग्न पद्धती राहणीमान साधे होते. आता व्यसनाधीनतेत वाढ झाली आहे. पूर्वी ग्रामीण भागातील माणसाला विज्ञान माहीत नव्हते, पण तो जगत होता. आता व्यसनाधीनतेने त्याचे मोठे नुकसान होत असल्याचेही शेवटी प्रा कुलकर्णी यांनी सांगितले. डॉ. सुधाकर जाधव यांनी प्रास्ताविक केले. अशोक पाठक यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, बुधवार, दि. १९ डिसेंबर २०१८

## लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात योग शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने मंगळवारी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बचरी थंडीतही या शिबिराला मोठ्या संख्येने नागरिकांनी हजेरी लावली.

महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आयुर्वेदाचार्य डॉ.दीपक दिरंगे म्हणाले की, योगामुळे विद्यार्थ्यांच्या स्मरण शक्तिमध्ये आणि बुध्दिमत्तेत निश्चितपणे वाढ होण्यास मदत होत असल्याचे डॉ. दिरंगे यांनी सांगितले. आधुनिक वैद्यक शास्त्राने सुध्दा योगाचे महत्व मान्य केले असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना योगातील ध्यान पध्दती उपयुक्त असल्याचे यावेळी डॉ. दिरंगे यांनी सांगितले. या शिबिरात ध्यान, योगासने, प्राणायाम, संगीत ध्यान यातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. भागवत नाईकनवरे, उपप्राचार्य संभाजी तिडके, प्रा. शिवाजी आकात, प्रा. संतोष रंजवे, प्रा. गायकवाड, प्रा. महेश लाहोटी, प्रा. चांदजकर यांनी प्रयत्न केले.



**योग शिबीर ....** परतूर शहरातील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात मंगळवारी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना आयुर्वेदाचार्य डॉ. दीपक दिरंगे.

---

सभागृहात होतील. याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. जवाहर काबरा, डॉ. सुनील मिरगणे यांनी केले आहे.

व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश कापसे, ... समितीचे अध्यक्ष भगवान बनकर, श्रीमती भिसे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ... कल्पना दत्तात्रय हेलसकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार

जालना | बुधवार, २१ फेब्रुवारी २०१८

## छत्रपती शिवरायांच्या विचारांची गरज-प्रा.नवल

परतूर/प्रतिनिधी

संभ्रमित आणि आत्मभान हरवलेल्या समाजाला छत्रपतींच्या विचार आणि कार्याची गरज असून, छत्रपतींचे स्वराज्य हे सर्व समाजाच्या विकासाचे होते, असे प्रतिपादन प्रा. पांडुरंग नवल यांनी केले.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराज आणि सद्य:परिस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले. विचार मंचावर प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. शंकर तळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. नवल म्हणाले की, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या भाजीच्या देठाची काळजी घेणारे छत्रपती होते, यावरुन माणसाची आणि माणुसकीची किती काळजी घेत असतील याचा आपण विचार करावा. छत्रपतींचा संघर्ष हा धर्म संघर्ष नसून, सत्तासंघर्ष होता. या सत्तासंघर्षात सर्वांना समान न्याय होता म्हणून त्यांच्या लढ्यात अठरापगड जातींची आणि धर्माची माणसे काम करीत.

परंतु काही तथाकथित लोकांनी चुकीचा इतिहास सांगून जाती धर्मात भांडणे लावण्याचे काम केले. त्यामुळे छत्रपतींचा खरा इतिहास गावपातळीवर नेण्याचे काम तुमच्यावर आणि आमच्यावर आहे. आज शेतकऱ्यांसोबत त्यांची मूल आत्महत्या करीत आहेत, हे खरे स्वराज्य नाही असेही शेवटी म्हणाले. सूत्रसंचलन प्रा. शरद बोराडे यांनी तर आभार प्रा. राम खालापुरे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा.दिनकर टकले, प्रा.पुरुषोत्तम वायाळ, प्रा.सुधाकर जाधव, प्रा. विजयानंद गंगावणे, प्रा. मिलिंद रवरात, प्रा.पंडित शते, प्रा संतोष कदम, केशव बरकुले, प्रा. वैशाली चौधरी, प्रा. राम वायाळ आदींची उपस्थिती होती.

९२

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, सोमवार, दि. २७ ऑगस्ट २०१८

## कठोर परिश्रमाशिवाय यश नाही- वाळके

लोकमत न्यूज नेटवर्क



परतूर: विद्यार्थी जीवनात परिश्रम घेतल्या शिवाय यश संपादन करता येत नसल्याचे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांनी केले.

येथील लाल बाहदूर शास्त्री महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेविषयी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते पाहूणे संतोष वाळके उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष कुणाल आकात, प्रचार्य डॉ. भगवान दिरंगे, केंद्र समन्वयक डॉ. दिनकर टकले होते. दिवसें- दिवस परीक्षा पध्दत बदलत चालली आहे. विद्यार्थी आता टेक्नॉसॅव्ही झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी परिश्रमासह टेक्नोलॉजीचा वापर करुन अभ्यास करुन यश संपादन करावे, विद्यार्थी जिवनात जिद्द, चिकाटी, मेहनत व कठोरपरिश्रम घेण्याची जो तयारी ठेवतो तोच यशस्वी होत असल्याचे वाळके म्हणाले. विद्यार्थ्यांनी खचून न जाता या परिक्षेला तयारीनिशी सामोरे जा यश तुमच्या हातात आहे, असेही उपविभगीय पोलिस अधिकारी वाळके यांनी सांगीतले.

यावेळी प्रा. राजेंद्र उद्दाण, डॉ. सदाशीव मुळे, डॉ. रवी प्रधान, प्रा. सिध्दार्थ कुलकर्णी प्रा दिलीप मन्वर, प्रा. महेश लाहोटी, प्रा. बद्रीनारायण बिडवे, प्रा. शरद बोराडे, प्रा. शैलेंद्र शेलार उपस्थित होते.

26



परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात कॉपीमुक्त कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. दिनकर टकले व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

# आपले भविष्य आपल्या हाती : डॉ. दिनकर टकले

परतूर/प्रतिनिधी

आपले भविष्य हे आपल्या मिळणाऱ्या मार्कांवर नसून विकसित केलेल्या गुणवत्ता व कौशल्यावर आधारित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गुण कौशल्यावर लक्षकेंद्रित करुन आपले भविष्य घडवावे असे मत, डॉ. दिनकर टकले यांनी व्यक्त केले.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कॉपी मुक्त कार्यशाळेचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे होते. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. भागवत नाईकनेवरे यांनी केले. यावेळी डॉ. सुधाकर जाधव, डॉ. शंकर तळेकर, प्रा. शरद बोराडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. टकले म्हणाले, आजचा काळ हा गुणात्मक स्पर्धेचा आहे. किमान पात्रतेच्या नंतर गुणात्मक कौशल्य तपासण्यासाठी परीक्षा घेतल्या जातात. त्यावेळी आपण कमी पडतो. त्यामुळे महाविद्यालय हे तुमच्या ज्ञानात्मक, गुणात्मक, कौशल्यात्मक या गुणांकडे आवर्जुन लक्ष देत असते. गरज आहे ती तुम्ही घेण्याची. गैरमार्गाने मिळवलेले गुण भविष्यात उपयोगी पडत नाहीत. त्या मार्गाचा विचारही विद्यार्थ्यांनी डोक्यात आणू नये असेही शेवटी म्हणाले.

यावेळी कृष्णा डासाळकर, अमोल बाबर या विदयार्थ्यांनीही कॉपी मुक्ती बद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. सुधाकर जाधव यांनी केले. आभार शुभागी तरासे यांनी मानले.

Auranagabad Edition
31 Jan. 2019 Page No. 12

सकाळ | जालना
औरंगाबाद, शुक्रवार, २५ जानेवारी २०१९
TODAY
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800



# चांगल्या गोष्टींचा स्वीकार गरजेचा

## डॉ. प्रकाश आंबेकर : परतूरला बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यानमाला

**परतूर, ता. २४ (बातमीदार) : जीवनातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार गरजेचा आहे, त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, शिवाय अध्ययन कौशल्यात वाढ होते, असे मत डॉ. प्रकाश आंबेकर यांनी व्यक्त केले.**



परतूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. प्रकाश आंबेकर. या वेळी कपिल आकात, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे आदी. (छायाचित्र : योगेश बरिदे)

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात शिक्षणमहर्षी बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यानमालेत गुरुवारी (ता. २४) डॉ. आंबेकर 'व्यक्तिमत्त्व विकास आणि अध्ययन कौशल्य' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कपिल आकात होते. या वेळी डॉ. गणेश चंदनशिवे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेश करपे, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव यांची उपस्थिती होती.

डॉ. आंबेकर म्हणाले, की ध्येय ठरवून कार्याला सुरवात केली म्हणजे एक दिवस यश येतो. प्रयत्न प्रामाणिक असायला हवे. वेळेचा उपयोग तुम्ही कशाप्रकारे करता यावर तुमचे व्यक्तिमत्त्व ठरते. नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करावे, काय करायचे हे तुम्हाला माहीत पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात डॉ. चंदनशिवे, श्री. करपे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. चंदनशिवे यांनी सादरीकरण करीत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पाठक यांनी केले. प्रा. शरद बोराडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. विशाल देशमुख, अमोल आवटे, गोविंद मटीकलोकर आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**व्याख्यानमालेत आज**

व्याख्यानमालेत शुक्रवारी (ता. २५) 'नैतिक मूल्ये आणि वर्तमानकालीन नैतिकता' या विषयावर वंदना गोरे यांचे सकाळी साडेदहा वाजता व्याख्यान होणार आहे. समारोप कार्यक्रमानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक तेजनकर यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे. अध्यक्षस्थानी कपिल आकात राहतील. संस्थेचे उपाध्यक्ष कुणाल आकात, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे यांची उपस्थिती राहील.

सकाळ औरंगाबाद, शुक्रवार, २४ ऑगस्ट २०१८

Today

# विद्यापीठ वर्धापनदिन साजरा

## जिल्ह्यातील महाविद्यालयांत विविध कार्यक्रम

जालना, ता. २३ (बातमीदार) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन गुरुवारी (ता. २३) शहरातील विविध महाविद्यालयांत उत्साहात साजरा करण्यात आला.

**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय :** येथे प्राचार्य डॉ. कविता प्रशस्त यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी बीए अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यापीठातून गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झालेला विद्यार्थी शिवानंद जायस्वाल व ऋषिकेश टकले यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन क्रीडा विभागप्रमुख डॉ. बी. बी. सले यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**जेईएस महाविद्यालय :** येथे झालेल्या कार्यक्रमास साहित्यिक डॉ. रावसाहेब ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. मदन यांनी प्रास्ताविकात विद्यापीठ स्थापनेबाबतची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीनानाथ पवार यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



परतूर : लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात गुरुवारी विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त व्याख्यानात बोलताना डॉ. भगवान दिरंगे.

**अजितदादा पवार महाविद्यालय :** येथे विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दिलीप देवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डी. टी. नालेगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास डॉ. सुनील नवन, प्रा. सुदर्शन मीर, प्रा. वर्षा देशमाने, प्रा. कमलाकर राऊंडे, राजेश पवार, धनंजय घुले, संजय चव्हाण, सचिन भुतेकर यांची उपस्थिती होती.

**कै. संतुकराव खोमणे महाविद्यालय :** येथे संस्थेचे कोषाध्यक्ष रवी खोमणे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमास प्रा. गजानन कदम, प्रा. चंद्रेरेखा गोस्वामी, प्रा. अश्विनी क्षीरसागर, ऋषिकेश अंभोरे, दामोधर शेळके यांची उपस्थिती होती.

**बालसावंगी :** येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठ ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर मानम, अविनाश गवळी, गोपाळ लाठे, गणेश गवळी, विलास बडे, सुरेश आंबेकर, नीलेश शिवाळे यांची उपस्थिती होती.

**आदर्श महाविद्यालय :** येथे झालेल्या कार्यक्रमात प्रा. नरेंद्र फुले, श्री. गजबे, व्यंकटेश कोथळकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

**परतूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात गुरुवारी (ता. २३) व्याख्यान घेण्यात आले. यावेळी डॉ. भगवान दिरंगे म्हणाले, की ज्ञानामुळेच मानवाचा सर्वांगीण विकास होतो. ज्ञानाची प्रक्रिया सतत चालणारी असून ती ज्ञानदानाचे काम विद्यापीठे करीत असतात. त्यामुळे आपल्या विकासात विद्यापीठाचे योगदान अनन्यसाधारण आहे. कार्यक्रमास डॉ. दिनकर टकले, उपप्राचार्य डॉ. सदाशिव मुळे, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. रवी प्रधान, प्रा. संभाजी तिडके उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सुधाकर जाधव, तर सूत्रसंचालन प्रा. अशोक पाठक यांनी केले. प्रा. शरद बोराडे यांनी आभार मानले.

**घारद :** येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात गुरुवारी (ता. २३) विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्राचार्य राजाराम दोडभोडे यांच्या उपस्थितीत विद्यापीठ ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक विलास लोखंडे, किशोर बाप, प्रा. संतोष काटोले, प्रा. राजू शिंदे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. ३ जानेवारी २०१८ २

# स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक; लालबहादूर शास्त्री विद्यालय अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : परतूर पंचायत समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाने यश संपादन केले असून, या विद्यालयाची रोहिणी सुरुंग ही ५ हजार रुपयांच्या बक्षिसाची मानकरी ठरली.

महाविद्यालयीन युवा शक्तीला पाणी पुरवठा व स्वच्छता या विषयामध्ये सहभागी करुन घेण्यासाठी पंचायत समितीच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सभापती रामेश्वर तनपूरे, प्राचार्य देविदास ठोकरे हे होते.



परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वच्छता करंडक स्पर्धेत यश संपादन केल्यानंतर रोहिणी सुरुंग, ऐश्वर्या तनपुरे, श्रुती बरसालेसह प्राचार्य बी. टी. दिरंगे, उपप्राचार्य संभाजी तिडके, प्रा. पटेल, प्रा. पाचपोळ, प्रा. गायकवाड, प्रा. नाईकनवरे आदी.

या स्पर्धेत शास्त्री महाविद्यालयातील रोहिणी सुरुंग हिने वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच कनिष्ठ गटात ऐश्वर्या नवनाथ तनपुरे प्रथम तर श्रुती जगदीश्वर बरसाले हिने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. परीक्षक म्हणून प्रा. अशोक पाचपोळ, प्रा. रोहिणकर, लिपणे यांनी काम पाहिले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव कपिल आकात, उपाध्यक्ष कुणाल आकात, प्राचार्य बी. टी. दिरंगे, उपप्राचार्य संभाजी तिडके, डॉ. सुधाकर जाधव, प्रा. भागवत नाईकनवरे, पर्यवेक्षक अनिल सोनपावले, प्रा. अंकुश जाधव, प्रा. राघो गायकवाड, प्रा. संजय सोनकांबळे, प्रा. शिवाजी आकात, प्रा. जालिंदर इघारे, प्रा. नारायण बिडवे, प्रा. टेकाळे, प्रा. खेडकर, प्रा. नागरगोजे, प्रा. बढे, प्रा. झरेकर, प्रा. जोशी, प्रा. प्रशांत अंभुरे, प्रा. रिंढे आदींनी यशस्वीतांचे कौतुक केले आहे.

पहिले पुण्यस्मरण

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, गुरुवार, दि. २ ऑगस्ट २०१८

## अण्णा भाऊंचे साहित्य प्रेरणादायी

**भगवान दिरंगे** : परतूर येथे अभिवादन कार्यक्रमात प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य मानव मुक्तीच्या लढ्याला बळ देणारे असून, त्यातून विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा आणि दिशा मिळेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे यांनी व्यक्त केला.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. सदाशिव मुळे, डॉ. रवी प्रधान, प्रबंधक देवडे हे होते.



परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात अण्णा भाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे. सोबत उपप्राचार्य डॉ. सदाशिव मुळे, डॉ. रवी प्रधान आदी.

पुढे प्राचार्य दिरंगे म्हणाले की, शोषित, वंचित व मागासलेल्या माणसाला न्याय देण्याचे काम त्या काळात साठेंनी केले. त्यांच्या साहित्यातून विद्रोही विचारांची मांडणी केली. त्या मांडणीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुध्दांच्या विचार सरणीचा प्रभाव होता, म्हणूनच त्यांचे साहित्य माणुसकीवर प्रेम करणारे होते, असेही प्राचार्य दिरंगे यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. शरद बोराडे यांनी केले, तर आभार प्रा. दिलीप मव्हार यांनी मानले. यावेळी दरवर्षी अण्णा भाऊंच्या साहित्य विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले पाहिजे असा विचार यावेळी व्यक्त करण्यात आला. या सकारात्मक विचाराला उपस्थितांनी मोठा प्रतिसाद देऊन नियोजन करण्यावर एकमत झाले.

17-18 28


लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, गुरुवार, दि. १ मार्च २०१८


## मराठी भाषा ज्ञान भाषा होणे आवश्यक- लुलेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

परतूर : मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास असून, बदलत्या काळानुरूप ही भाषा ज्ञानभाषा होणे आवश्यक असल्याचे मत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त लालबहादूर शास्त्री महा विद्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुधाकर जाधव, उपप्राचार्य संभाजी तिडके, राम अग्रवाल हे उपस्थित होते.

लुलेकर म्हणाले की, ही भाषा ज्ञान भाषा होण्यासाठी विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वैद्यकीय या सर्व विद्या शाखेतील लोकांनी मराठीचा आग्रहपूर्वक नव्या संकल्पनेसह वापर करणे गरजेचे आहे, असे सांगून लुलेकर म्हणाले की, माणसाने भाषा निर्माण केली आणि भाषेने माणूस निर्माण केला, हा आपला इतिहास आहे. मराठी भाषेची संस्कृती घडवण्यात संतांची मोठी भूमिका आहे. संत नामदेवांनी मराठीचा झेंडा पंजाबात नेला. गद्य वाङ्मय महानुभाव पंथाने दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी कार्यालयीन भाषा मराठीत आणली. राज्यव्यवहार कोष निर्माण केले. परंतु आज आपण जातीधर्माची भाषा बोलू लागलो आहोत. त्यामुळे एकसंघ समाजात फूट पडत आहे. फुले, शाहू, आंबेडकरांची भाषाच आपणास एकसंघ ठेवेल, असाही विश्वास लुलेकर यांनी व्यक्त केला.



परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. प्रल्हाद लुलेकर, व्यासपीठावर प्राचार्य भगवान दिरंगे, डॉ. सुधाकर जाधव आदी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुधाकर जाधव यांनी केले. यावेळी प्रा. दिनकर टकले, प्रा. सदाशिव कमळकर, प्रा. शंकर तळेकर, प्रा. विजयानंद गंगावणे, प्रा. कैलास सोनवणे, प्रा. शरद घोराडे, दत्तात्रय देवडे, प्रा. पुरुषोत्तम वायाळ, प्रा. अनिल सोनपावले, प्रा. अंकुश जाधव यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पाठक यांनी केले.

MY जालना

पुढारी शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८

# सामाजिक, आर्थिक विषमतेमुळे देशाचे नुकसान : डॉ. सोनकांबळे



परतूर : लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात बोलताना डॉ. हनुमंत सोनकांबळे, मंचावर प्राचार्य डॉ.भगवान दिरंगे, डॉ.सखाराम टकले.

परतूर : प्रतिनिधी

सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे देशाचा विकास खुंटला असल्याचे प्रतिपादन डॉ. हनुमंत सोनकांबळे यांनी केले.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात लोकशाही पंधरवडा दिनानिमित्ताने लोकशाही निवडणूक व सुशासन या विषयावरील व्याख्यान झाले. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. सखाराम टकले आदींची उपस्थिती होती.

डॉ.सोनकांबळे म्हणाले की, भारताच्या संविधान सभेने भारतीय नेतृत्वासमोर विषमतेचा धोका स्पष्ट केला होता. ही विषमता आपल्याला संपुष्टात आणायची होती. परंतु मागील सत्तर वर्षात हे आपल्याला करता आले नाही. जोपर्यंत जातीय व्यवस्था नष्ट होत नाही, तोपर्यन्त लोकशाही बळकट होणार नाही. सूत्रसंचालन प्रा.शरद बोराडे यांनी तर प्रा.अशोक पाठक यांनी आभार मानले. यावेळी प्रा.शंकर तळेकर, प्रा. बद्रीनारायण बिडवे, प्रा. कैलास सोनुने, प्रा.राम वायाळ, प्रा.वैशाली प्रधान, प्रा. श्रीमंत सुरवसे आदी उपस्थित होते.

सभागृहात होतील. याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. जवाहर काबरा, डॉ. सुनील मिरगणे यांनी केले आहे.

व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश कापसे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भगवान बनकर, श्रीमती भिसे, कल्पना दत्तात्रय हेलसकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार

जालना बुधवार, २१ फेब्रुवारी २०१८

# छत्रपती शिवरायांच्या विचारांची गरज-प्रा.नवल

**परतूर/प्रतिनिधी**

संभ्रमित आणि आत्मभान हरवलेल्या समाजाला छत्रपतींच्या विचार आणि कार्याची गरज असून, छत्रपतींचे स्वराज्य हे सर्व समाजाच्या विकासाचे होते, असे प्रतिपादन प्रा. पांडुरंग नवल यांनी केले.

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराज आणि सद्य:परिस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले. विचार मंचावर प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, डॉ. शंकर तळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. नवल म्हणाले की, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या भाजीच्या देठाची काळजी घेणारे छत्रपती होते, यावरुन माणसाची आणि माणुसकीची किती काळजी घेत असतील याचा आपण विचार करावा. छत्रपतींचा संघर्ष हा धर्म संघर्ष नसून, सत्तासंघर्ष होता. या सत्तासंघर्षात सर्वांना समान न्याय होता म्हणून त्यांच्या लढ्यात अठरापगड जातींची आणि धर्मांची माणसे काम करीत.

परंतु काही तथाकथित लोकांनी चुकीचा इतिहास सांगून जाती धर्मात भांडणे लावण्याचे काम केले. त्यामुळे छत्रपतींचा खरा इतिहास गावपातळीवर नेण्याचे काम तुमच्यावर आणि आमच्यावर आहे. आज शेतकऱ्यांसोबत त्यांची मुलं आत्महत्या करीत आहेत, हे खरे स्वराज्य नाही असेही शेवटी म्हणाले. सूत्रसंचलन प्रा. शरद बोराडे यांनी तर आभार प्रा. राम खालापुरे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा.दिनकर टकले, प्रा.पुरुषोत्तम वायाळ, प्रा.सुधाकर जाधव, प्रा. विजयानंद गंगावणे, प्रा. मिलिंद रवरात, प्रा.पंडित गाते, प्रा.संतोष कदम, केशव बरकुले, प्रा. वैशाली चौधरी, प्रा. राम वायाळ आदींची उपस्थिती होती.

लोकमत

# हॅलो जालना

औरंगाबाद, रविवार, दि. ०८ जुलै २०१८



**मदत...** परतूर तालुक्यातील आंबा सर्कलमधील बाबूलतारा येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलाला धनादेश देतांना कपिल आकात, कुणाल आकात, विलास आकात व अन्य मान्यवर

2017 - 2018

डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद
नामविस्तार दिन

14-Jan 2019

दिव्य मराठी
जालना जिल्हा
जालना, सोमवार, २१ जानेवारी २०१९

# मराठवाड्याचा शैक्षणिक अनुशेष भरून काढण्यात विद्यापीठाचे योगदान मोलाचे

प्रतिनिधी | परतूर

स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाड्याचे शैक्षणिक मागासलेपण दूर करून विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम विद्यापीठाने केले. विकासाचा अग्रदूत असा विद्यापीठाचा नामोल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव म्हणजे विद्यापीठाचा गौरवच आहे. परंतु या महामानवाचे नाव देण्यासाठी जो वैचारिक संघर्ष करावा लागला तो दुर्दैवी आहे असे प्रतिपादन डॉ. सदाशिव मुळे यांनी केले. परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात आयोजित रौप्यमहोत्सवी नामविस्तार दिन कार्यक्रमात अध्यक्षीय समारोपप्रसंगी ते बोलत होते.



परतूर येथील लालबहादुर शास्त्री महाविद्यालयात बोलताना डॉ. सदाशीव मुळे.

या वेळी विचार मंचावर डॉ. दिनकर टकले, प्रा. दिलीप मनवर, डॉ. शंकर तळेकर, डॉ. रवी प्रधान आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मुळे म्हणाले, विद्यापीठ नामविस्ताराचा लढा समता व अस्मितेसाठी होता. बहुजनांच्या प्रेरणेसाठी होता. राष्ट्राच्या विकासासाठी बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या कार्याची आणि विद्वत्तेची जगाने दखल घेतली. विद्यापीठाच्या अगोदर मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून सर्वांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली हा इतिहास आहे. या भागाला एका विद्यापीठाची गरज आहे, ही मागणी प्रथम बाबासाहेबांचीच होती असेही शेवटी ते म्हणाले. याप्रसंगी प्रा. दिलीप मनवर, डॉ. दिनकर टकले, प्रा. शरद बोराडे, डॉ. रवी प्रधान, डॉ. शंकर तळेकर यांनीही नामविस्तार दिनाचा इतिहास उलगडून दाखवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पाठक तर आभार डॉ. वैशाली चौधरी यांनी मानले.

सकाळ | जालना
औरंगाबाद, शुक्रवार, २५ जानेवारी २०१९
TODAY
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800



# चांगल्या गोष्टींचा स्वीकार गरजेचा

## डॉ. प्रकाश आंबेकर : परतूरला बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यानमाला

**परतूर, ता. २४ (बातमीदार) : जीवनातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार गरजेचा आहे, त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, शिवाय अध्ययन कौशल्यात वाढ होते, असे मत डॉ. प्रकाश आंबेकर यांनी व्यक्त केले.**

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात शिक्षणमहर्षी बाबासाहेब आकात स्मृती व्याख्यानमालेत गुरुवारी (ता. २४) डॉ. आंबेकर 'व्यक्तिमत्त्व विकास आणि अध्ययन कौशल्य' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कपिल आकात होते. या वेळी डॉ. गणेश चंदनशिवे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेश करपे, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव यांची उपस्थिती होती.

डॉ. आंबेकर म्हणाले, की ध्येय ठरवून कार्याला सुरवात केली म्हणजे एक दिवस यशाचा येतो. प्रयत्न प्रामाणिक असायला हवे. वेळेचा उपयोग तुम्ही कशाप्रकारे करता यावर तुमचे व्यक्तिमत्त्व ठरते. नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करावे, काय करायचे हे तुम्हाला माहीत पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.



परतूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. प्रकाश आंबेकर. या वेळी कपिल आकात, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे आदी. (छायाचित्र : योगेश बरिदे)

कार्यक्रमात डॉ. चंदनशिवे, श्री. करपे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. चंदनशिवे यांनी सादरीकरण करीत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पाठक यांनी केले. प्रा. शरद बोराडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. विशाल देशमुख, अमोल आवटे, गोविंद [illegible] आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### व्याख्यानमालेत आज

व्याख्यानमालेत शुक्रवारी (ता. २५) 'नैतिक मूल्ये आणि कार्यानुभूतीतील नैतिकता' या विषयावर [illegible] यांचे सकाळी साडेदहा वाजता व्याख्यान होणार आहे. समारोप कार्यक्रमानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक [illegible] यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे. अध्यक्षस्थानी कपिल आकात राहतील. संस्थेचे उपाध्यक्ष [illegible] आकात, प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे यांची उपस्थिती राहील.



Oath for anticorruption






**Plastic Collection Students with N.S.S. P. O. Dr. Susar**